# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान वेब पोर्टल
## मार्गदर्शक पुस्तिका


आपल्या इंटरनेट ब्राउझरमध्ये खालील संकेतस्थळ उघडा:

☞ https://cmsprardd.maharashtra.gov.in/

**STEP १: मुख्यपृष्ठावरील "ऑनलाईन अर्ज करा" या पर्यायावर क्लिक करा.**





**STEP २: पुढे जा** या बटणावर क्लिक केल्यानंतर कंट्रोल लॉगिन पेज वर जाईल



**लॉगिन पेजवर आल्यानंतर**

**टीप: लॉगिन पृष्ठावर** आल्यानंतर, तुमच्या तालुक्यातील **गटविकास अधिकारी (BDO)** यांच्याकडून मिळालेले **वापरकर्ता नाव (LGD कोड)** आणि **पासवर्ड** भरा.




वापरकर्तानाव व पासवर्ड भरून झाल्यावर, दिलेला **कॅप्चा (Captcha)** भरा.

शेवटी **'लॉगिन'** या बटणावर क्लिक करा.

**पासवर्ड विसरल्यास:**

लॉगिन पेजवर **'Forgot Password'** बटणावर क्लिक करा.




या ठिकाणी तुमचा **वापरकर्तानाव )६ अंकी LGD कोड(** भरा आणि **'ओटीपी मिळवा'** वर क्लिक करा

**'Forgot Password'या बटणावर क्लिक करा** (पासवर्ड बदलण्यासाठी, तुम्हाला प्रथम तुमच्या जिल्ह्यातील विस्तार अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या User ID आणि Password ने लॉगिन करावे लागेल. त्यानंतर प्रोफाइल पृष्ठावरून पुढे गेल्यानंतर, तुम्ही त्या प्रोफाइलमध्ये जो मोबाईल क्रमांक जोडणार आहात, त्या क्रमांकावर 'Forgot Password' साठी OTP प्राप्त होईल.)

## २) प्रोफाइल अद्ययावत करा .Profile Update)


यशस्वी लॉगिन झाल्यावर, तुम्हाला **वापरकर्ता तपशील** (User Details) भरून प्रोफाइल अपडेट करणे आवश्यक आहे.

यशस्वी लॉगिन झाल्यावर डाव्या मेनूमधील **'माझी प्रोफाईल'** या बटणावर क्लिक करा.




ड्रॉपडाऊन मेनूमधील **‘प्रोफाईल अद्ययावत करा’** या बटणावर क्लिक करा.

**नंतर प्रोफाईल अद्ययावत करा’ या बटणावर क्लिक केल्यानंतर खाली ‘वापरकर्ता तपशील’ म्हणजेच प्रोफाईल खुले होईल**




**फाईल पेज अद्यावत करताना खालील माहिती भरणे आवश्यक आहे .**

१. सर्व माहिती अचूक भरल्यानंतर सादर करा या बटणावर क्लिक करा.




२. जिल्हा (District):

आपल्या ग्रामपंचायतीचा जिल्हा निवडा. उदा. — रत्नागिरी, ठाणे, नाशिक इ.

३. तालुका (Taluka):
संबंधित जिल्ह्यातील तालुका निवडा. उदा. — रत्नागिरी, दापोली, मंगळवेढा इ.

४. गाव (Village):
आपल्या गावाचे नाव अचूकपणे भरा. (हे फील्ड आवश्यक आहे)

५. ग्रामपंचायतीचे नाव (Gram Panchayat Name):
ज्या ग्रामपंचायतीखाली आपले गाव येते, ते नाव लिहा.

६. ग्रामपंचायतीचा LGD कोड (LGD ६ digits Code)
शासनाने दिलेला अधिकृत LGD कोड प्रविष्ट करा. (अत्यंत महत्त्वाचे फील्ड)

७. लोकसंख्या श्रेणी निवडा (Select Population Category):
आपल्या गावाची लोकसंख्या कोणत्या श्रेणीत येते ते ड्रॉपडाऊनमधून निवडा.
उदा. २००० पर्यंतची लोकसंख्या, २००० ते ५००० लोकसंख्या , ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या

८. मोबाईल नंबर (Mobile Number):
ग्रामपंचायतीचा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक प्रविष्ट करा.
☞ त्यानंतर Get OTP बटणावर क्लिक करा.
OTP प्राप्त झाल्यावर तो योग्य ठिकाणी टाका.

९. ई-मेल आयडी (Email ID):
अधिकृत ई-मेल आयडी प्रविष्ट करा. (हे फील्ड आवश्यक आहे)

१०. गावाची लोकसंख्या (Village Population):
गावातील एकूण लोकसंख्या प्रविष्ट करा.

**टिप** : <u>२०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या वाढीचा दर लक्षात घेऊन सद्याची लोकसंख्या निश्चित करावी. त्या संदर्भात ग्रामपंचायतीचा ठराव करून घ्यावा आणि त्यानुसार लोकसंख्या भरावी.</u>

११. महिला लोकसंख्या (Female Population):
गावातील महिलांची संख्या लिहा.

१२. पुरुष लोकसंख्या (Male Population):
गावातील पुरुषांची संख्या लिहा.

१३. कुटुंब संख्या (Number of Families):
गावातील एकूण कुटुंबांची संख्या लिहा.

१४. शेतकरी संख्या (Number of Farmers):
गावातील नोंदणीकृत शेतकऱ्यांची संख्या भरा.

१५. मतदारांची लोकसंख्या (Voter Population):
गावातील मतदारांची एकूण संख्या भरा.

१६. ग्रामपंचायतीमध्ये अन्य गावे समाविष्ट आहेत का? (Are Other Villages Included?):
ड्रॉपडाऊनमधून होय / नाही निवडा.

१७.सर्व माहिती **अचूक भरल्यानंतर 'सादर करा' (Submit)** या बटणावर क्लिक करा.

**सूचना :**

- सर्व फील्ड भरणे आवश्यक आहे. चुकीची माहिती भरल्यास प्रोफाइल अपडेट होणार नाही
- सर्व माहिती शासनाच्या अधिकृत नोंदीनुसार भरा.
- चुकीची माहिती भरल्यास प्रोफाईल अपडेट होणार नाही.
- सर्व माहिती भरल्यानंतर पुन्हा एकदा तपासा आणि मगच सादर करा.

### ◈ प्रोफाइलमध्ये ई-मेल आयडी / मोबाईल क्रमांक बदलाबाबत सूचना

"ई-मेल आयडी किंवा मोबाईल क्रमांक अद्ययावत करण्याची आवश्यकता असल्यास, कृपया संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना खाली नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर पत्राद्वारे विनंती करणे अनिवार्य राहील."

## 3. पूर्व प्रश्नावली भरणे (Preliminary Questionnaire)

- पूर्व प्रश्नावली का भरायची?

उद्देश:

- ग्रामपंचायतीची कामाची सध्याची स्थिती जाणून घेण्यासाठी पूर्व प्रश्नावलीतील ४४ प्रश्नांची प्रश्नावली लवकरात लवकर भरणे आवश्यक आहे.
- या प्रक्रियेनंतर उद्दिष्ट साध्य अहवाल दिनांक 1 जानेवारी ते 8 जानेवारी 2026 या कालावधीत करण्यात येईल.
- या दोन्ही प्रश्नावलींचे (पूर्व प्रश्नावली व ) मुख्य उद्दिष्ट म्हणजे ग्रामपंचायतीची सध्याची कामाची स्थिती तसेच अभियान अंतर्गत साध्य झालेली प्रगती यांचे मूल्यांकन करणे आहे

## सूचना

### मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियान

या अभियानांतर्गत ग्रामपंचायतींच्या सध्याच्या कामकाज स्थितीचे तसेच अभियानाच्या माध्यमातून साध्य झालेल्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी दोन प्रश्नावली तयार करण्यात आल्या आहेत

1. **पूर्व प्रश्नावली**
2. **मूळ प्रश्नावली**

**पूर्व प्रश्नावली** ही ग्रामपंचायतीची प्राथमिक माहिती व विद्यमान कामकाजाची स्थिती जाणून घेण्यासाठी आहे. ही प्रश्नावली पूर्णपणे व अचूकरीत्या भरल्यानंतरच संबंधित ग्रामपंचायत *मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियान स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पात्र* ठरेल.

**मूळ प्रश्नावली** ही स्पर्धेच्या मूल्यांकनासाठी आवश्यक असलेली मुख्य प्रश्नावली असून ती केवळ पूर्व प्रश्नावली वेळेत व पूर्ण भरल्यानंतरच भरता येईल.


**महत्त्वाची नोंद:**
पूर्व प्रश्नावलीस गुण (Marks) दिले जाणार नाहीत. ही केवळ स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आवश्यक पात्रता निश्चित करण्यासाठी आहे.

**प्रश्नावलीचे स्वरूप (उदाहरणे):**

**<u>मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज योजनेची पूर्व प्रश्नावली पुढील प्रमाणे भरावी:</u>**

आपणासाठी प्रश्नावलीतील ४ प्रकारच्या प्रश्नांची उदाहरणे आम्ही प्रस्तुत करत आहोत.

**नमुना क्रमांक 1 : उदा. 1: 'आपले सरकार सेवा केंद्र' उपलब्ध आहे का?**




**<u>प्रश्नावली भरताना घ्यावयाची काळजी :</u>**

***. प्रत्येक प्रश्नासाठी खाली ४ किंवा त्याहून अधिक पर्याय दिलेले असतील.**

**त्या पैकी फक्त एकच योग्य पर्याय निवडा.**

**<u>वर दिलेल्या प्रश्नावलीतील पहिल्या प्रश्नाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे:</u>**

प्रश्न क्रमांक १: आपल्या ग्रामपंचायतीमध्ये 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा 'नागरी सेवा सुविधा केंद्र (CSC)' उपलब्ध आहे का?

१☐ होय, उपलब्ध व कार्यरत आहे

२☐ होय, उपलब्ध आहे परंतु कार्यरत नाही


३☐ उपलब्ध नाही

जर आपण पर्याय क्र. १ — "होय, उपलब्ध व कार्यरत आहे" निवडला असेल,

तर खाली दर्शविल्याप्रमाणे ‘Upload’ नावाचा पर्याय दिसेल. त्या ठिकाणी आपण संबंधित फोटो, प्रमाणपत्र किंवा व्हिडिओ अपलोड करू शकता.

टीप: जर फोटो किंवा कागदपत्र एकापेक्षा अधिक असतील, तर ते एकत्रित (merge) करून PDF स्वरूपात अपलोड करा. अपलोड करण्यात येणाऱ्या फाइलचा आकार १५ MB पेक्षा जास्त नसावा.

## नमुना क्रमांक २: सीसीटीव्ही बसविणे




•


**या प्रश्नामध्ये तीन पर्याय दिलेले आहेत. आपण पहिला पर्याय निवडल्यानंतर खाली दोन चेक बॉक्स (फील्ड) उघडतील.**

- **पहिल्या बॉक्समध्ये बसविण्यात आलेल्या CCTV ची संख्या नमूद करावी.**
- **दुसऱ्या बॉक्समध्ये संबंधित CCTV नियंत्रण कक्ष किंवा स्थापनेचे छायाचित्र / फाईल अपलोड करावे.**

**टीप:**

- **पहिल्या बॉक्समध्ये अक्षरे लिहू नयेत, फक्त संख्या भरावी.**
- **दुसऱ्या बॉक्समध्ये अपलोड करण्यात येणाऱ्या फाईलचा आकार १५ MB पेक्षा अधिक नसावा.**

## नमुना क्रमांक ३: शाळा सुविधा सक्षमीकरण




या प्रश्नामध्ये तुम्हाला दोन पर्याय दिलेले आहेत –

१. सर्व सेवा उपलब्ध आहेत
जर तुम्ही हा पर्याय निवडला, तर खाली दिलेल्या सर्व सेवा आपोआप निवडल्या जातील.

२. काही सेवा उपलब्ध आहेत
जर तुम्ही हा पर्याय निवडला, तर तुम्हाला तुमच्या गावात उपलब्ध असलेल्या सेवांवर स्वतः क्लिक करावे लागेल. तसेच, उपलब्ध सेवांचा पुरावा म्हणून संबंधित फाइल्स किंवा फोटो अपलोड करावे लागतील.

टीप: फोटो किंवा फाइल अपलोड करताना फाइलचा आकार १५ MB पेक्षा जास्त नसावा.

**पूर्व प्रश्नावली दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत भरावी,त्यानंतर या प्रश्नावलीची लिंक बंद करण्यात येईल.**

## शासन निर्णय

**https://gr.maharashtra.gov.in/११४५/Government-Resolutions**

**सांकेतांक क्रमांक: २०२५०८०६१३२५४४५१२०**

## ४. तांत्रिक सहाय्यासाठी संपर्क (Technical Support)

MSPRA पोर्टलवर काम करताना काही तांत्रिक अडचणी आल्यास खाली दिलेल्या क्रमांकांवर **सकाळी १०:०० ते संध्याकाळी ६:०० या वेळेत** संपर्क साधावा.

- देवेंद्र पाटील – 📞 ७०६६५०५६५०
- जयश्री माळी – 📞 ७८४१८७८५५५
- सुमित वाघधरे – 📞 ९०२९८७६४८८

✉ **ई-मेल आयडी:** cmspra.info@gmail.com